Maharashtra State Innovation Society

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

#startupindia

**कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन**

**व**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर उस्मानाबाद**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

# जिल्हास्तरीय बूट कॅम्प स्टार्टअप प्रस्ताव सादरीकरण स्पर्धा

नवीन स्टार्टअप कल्पना असल्यास आजच नोंदणी करा

**ठिकाणः**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर उस्मानाबाद

**दिनांकः**
१३ ऑक्टोबर २०२२.
वेळ सकाळी १० वाजता

**नोंदणी साठी लिंक**
https://www.mahastartupyatra.in/

## पारितोषिके

| जिल्हास्तरीय | विभागस्तरीय | राज्यस्तरीय |
|---|---|---|
| प्रथम: रु. २५,०००/-<br>द्वितीय: रु. १५,०००/-<br>तृतीय: रु. १०,०००/- | ६ स्टार्टअप हिरो-<br>प्रत्येकी रु. १ लाख.<br>६ महिला उद्योजक-<br>प्रत्येकी रु. १ लाख | ७ क्षेत्रनिहाय<br>प्रत्येकी २ विजेते<br>प्रथम: रु १ लाख<br>द्वितीय: रु. ७५ हजार |

# महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा

## जिल्हास्तरीयप्रशिक्षण शिबीर व सादरीकरणसत्र - जिल्हास्तरीय विजेते

दिनांक –**13/10/2022**

जिल्हा - **Osmanabad**

### जिल्हास्तरीय विजेते –

| क्र | अर्ज क्रमांक (Application ID) | अर्जदाराचे नाव / टीम सहभागींचे नाव | संपर्क क्रमांक (Contact No) | संकल्पना / प्रस्तावित प्रकल्पाचे शीर्षक (Idea Title) | क्षेत्र (Sector) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **873** | **Deepak Poul** | **9921143048** | **Mix Organic Composite by using Compost Machine** | **Agriculture** |
| २ | **888** | **Umesh Dudhbhate** | **9096247493** | **Koncave Smart Grahak** | **IT ITES** |
| ३ | **930** | **Shrikant Bikkad** | **9766099965** | **Siddha Agro Export Chain** | **Agriculture** |

मूल्यांकन समिती–

| क्र | नाव (Name) | हुद्दा (Designation) | सही (Signature) |
|---|---|---|---|
| १ | Dr. Suyog Amrutrao | H.O.D. Dept. Of Management Science, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad, sub Campus, Osmanabad. | |
| 2 | Mr. N. P. Jawalikar | Manager, District Industry Center | |
| 3 | Mr. Sanjay Deshmane | President - Laghu Udyog Bharti, Marathwada | |
| 4 | Mr. S.R. Panke | Principal, Govt. ITI Osmanabad | |
| 5 | Mr. Manoj Chaudhary | Group Instructor, Govt. ITI Osmanabad | |
| 6 | | | |
| 7 | | | |
| ८ | | | |
| ९ | | | |



# पारितोषिके

## जिल्हास्तरीय

प्रथम : रु. २५,०००/-

द्वितीय : रु. १५,०००/-

तृतीय : रु. १०,०००/-

## विभागस्तरीय

प्रत्येक विभागस्तरावरील सर्वोत्कृष्ट उद्योजक व सर्वोत्कृष्ट महिला उद्योजिकेला रोख बक्षीस मिळेल (विभाग : नाशिक, कोकण, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, पुणे)

| वर्णन | एकूण विजेते | प्रत्येकी रक्कम |
|---|---|---|
| विभागाचा स्टार्ट अप हिरो | ६ | रु.१,००,००० |
| विभागीय सर्वोत्कृष्ट महिला उद्योजिका | ६ | रु.१,००,००० |

## राज्यस्तरावर पारितोषिके

| क्षेत्र | पहिले पारितोषिक | दुसरे पारितोषिक |
|---|---|---|
| कृषी | रु. १,००,००० | रु.७५,००० |
| शिक्षण | रु. १,००,००० | रु.७५,००० |
| आरोग्य | रु. १,००,००० | रु.७५,००० |
| सस्टेनीबिलिटी (कचरा व्यवस्थापन, पाणी, स्वच्छ उर्जा इ.) | रु. १,००,००० | रु.७५,००० |
| ई-प्रशासन | रु. १,००,००० | रु.७५,००० |
| स्मार्ट पायाभूत सुविधा आणि गतिशीलता | रु. १,००,००० | रु.७५,००० |
| इतर | रु. १,००,००० | रु.७५,००० |

जर एकच सहभागी २ वेग-वेगळ्यास्तरांवर विजेता ठरल्यास जास्त रकमेचे पारितोषिक त्या सहभागीस घोषित करून गुणवत्ता क्रमावारीनुसार पुढील सहभागींची निवड केली जाईल.
सर्व विजेत्यांची घोषणा राज्यस्तरीय समारंभात केली जाईल.

## रोख अनुदाना व्यतिरिक्त इतर लाभ

- प्री - इनक्युबेशन सहाय्य
- इनक्युबेशन सहाय्य
- बीज भांडवल सहाय्य
- तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन
- बौद्धिक संपदा हक्क व गुणवत्ता प्रमानणन यासाठी अर्थसहाय्य
- सॉफ्टवेअर व क्लाऊड क्रेडिट्स

व्यवस्थापनशास्त्र विभाग
विद्यापीठ उप-परिसर, उस्मानाबाद
दिनांकः ३०/०९/२०२२

**मा.संचालक महोदयांना सविनय सादर,**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवस्थापनशास्त्र विभागा मार्फत विद्यापीठ उप-परिसर येथे रोजगार मेळावा दि.१४ ऑक्टोबर २०२२ रोजी व स्टार्ट अप यात्रा- बूट कॅम्प (स्टार्ट अप प्रस्तावाचे सादरीकरण) दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी कार्यक्रम आयोजन करणे बाबत.

सादर करण्यात येते की, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवस्थापनशास्त्र विभागा मार्फत विद्यापीठ उप-परिसर उस्मानाबाद येथे जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा या करिता दि.१४ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १०:०० वा. रोजगार मेळावाचे आयोजन करावयाचे आहे. तसेच स्टार्ट अप यात्रा- बूट कॅम्प (स्टार्ट अप प्रस्तावाचे सादरीकरण) दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १०:०० वा. आयोजन करावयाचे आहे.

सदरील कार्यक्रमाच्या आयोजनासाठी लागणारा आवश्यक खर्च हा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, उस्मानाबाद यांच्याकडून मार्फत होणार आहे. परंतु दोन दिवस चालना-या कार्यक्रमास आवश्यकता भासल्यास विद्यापीठ उप-परिसर कार्यालय येथील आकस्मिक खर्च लेखशीर्षका अंतर्गत रु.५,०००/- खर्च अपेक्षित आहे.

(सुलभ संदर्भासाठी सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, उस्मानाबाद यांचे दि.३०/०९/२०२२ रोजीचे पत्र सोबत जोडण्यात आले आहे.)

सबब, आपली मान्यता असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, उस्मानाबाद व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवस्थापनशास्त्र विभागा मार्फत विद्यापीठ उप-परिसर येथे रोजगार मेळावा दि.१४ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १०:०० वा. व स्टार्ट अप यात्रा- बूट कॅम्प (स्टार्ट अप प्रस्तावाचे सादरीकरण) दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १०:०० वा. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. तसेच दोन दिवस चालना-या कार्यक्रमास आवश्यकता भासल्यास विद्यापीठ उप-परिसर कार्यालय येथील "आकस्मिक खर्च" लेखशीर्षका अंतर्गत रु.५,०००/- खर्च करण्यात येईल.

**लेखाशीर्षः "आकस्मिक खर्च"**

**तरतूदः** १,५०,०००/-

**शिल्लकः** 1,30,165/-

**प्रस्तावीक खर्चः** रु.५,०००/-

करिता मान्यतेस्तव तथा आदेशास्तव सादर.

6/10/22
कक्षअधिकारी

संचालक,
व्यवस्थापनशास्त्र विभाग

6/10/22
सहाय्यक कुलसचिव


Maharashtra State Innovation Society

#startupindia

# महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

## महाराष्ट्र शासन




## ध्यास नाविन्याचा, शोध नवउद्योजकांचा

### पार्श्वभूमी

...नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभा... ...य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण २०१८ जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी **महाराष्ट्र राज्य नाविन्यता ...** ही नाडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामधे स्टार्टअप परिसंस्थेच्या विकासाकरिता पूरक वातावरणनिर्मिती करुन त्यातून यशस्वी उद्योजक घडविण्याकरिता इनक्युबेटर्सची स्थापना, गुणवत्ता परीक्षण व बौद्धिक मालमत्ता हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक उपक्रम राबविण्यात येतात.

नाविन्यता, कल्पकता यांना भौगोलिकतेच्या मर्यादा नसतात, त्या कुठेही यशस्वी होऊ शकतात. नवकल्पनांना योग्य पाठबळ मिळण्याची आवश्यकता असते परंतु काही वेळा योग्य मार्गदर्शनाअभावी चांगल्या कल्पना प्रत्यक्षात उतरू शकत नाहीत. राज्यातील नागरिकांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी शासनामार्फत **महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेचे** आयोजन करण्यात येत आहे.

### स्टार्टअप यात्रेचे ३ टप्पे

**१. तालुकस्तरीय प्रचार व प्रबोधन** (Taluka Level Promotion & Mobilisation)

...येक तालुक्यात लोकसमुह एकत्रित होण्याच्या ठिकाणी स्टार्टअप यात्रेचा प्रचार व प्रबोधनसाठी एक फिरते वाहन (Mobile Van) येणार आहे. ...येक तालुक्यात लोकसमुह... ...ा संपूर्ण माहिती, नावीन्यपूर्ण संकल्पना व त्याचे इतर पैलू तसेच विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल माहिती देण्यात येणार आहे. नावीन्यपूर्ण कल्पना असलेले नागरिक आपल्या कल्पना यावेळी नोंदवू शकतात.

**२. जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर व सादरीकरण स्पर्धा** (District Level Bootcamp & Pitching Competition

सर्व तालुक्यातील प्रचार प्रसिद्धी नंतर, जिल्हास्तरावर प्रशिक्षण शिबीर व सादरीकरण स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे. प्रशिक्षण शिबिरात नवउद्योजकतेबाबतचे माहिती सत्र, स्थानिक उद्योजक व तज्ज्ञ मार्गदर्शक यांची व्याख्याने होणार आहेत. तसेच नोंदणी केलेल्या नवउद्योजकांच्या संकल्पनांची सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

**जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर व सादरीकरण स्पर्धा : वेळापत्रक**

| प्रथम सत्र - प्रशिक्षण शिबीर (सकाळी ०९.०० ते दुपारी १२.००) | द्वितीय सत्र - सादरीकरण स्पर्धा (दुपारी १.०० ते सायं. ६.००) |
|---|---|
| ...िती व प्रशिक्षण सत्रात विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती, ...ाच्या प्रवासातील महत्वाचे टप्पे याबाबत मार्गदर्शन व स्थानिक उद्योजकांची व्याख्याने | प्रत्येक सहभागीस १० मि. सादरीकरणची संधी (५ मि. सादरीकरण + ५ मि. प्रश्नोत्तर) |

**३. राज्यस्तरीय सादरीकरण स्पर्धा व विजेत्यांची घोषणा** (State Level Pitching Competition & Announcement of Winners)

प्रत्येक सादरीकरण सत्रातील उत्तम १० कल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण तज्ज्ञ समितीसमोर करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय विजेत्यांना रोख अनुदान तसेच आवश्यक पाठबळही पुरविण्यात येतील.

अधिक माहितीसाठी व आपला सहभाग नोंदविण्यासाठी भेट द्या :

www.msins.in    www.mahastartupyatra.in